RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

रविवार, १२ एप्रिल २०२६ | वर्ष : ६ | अंक : १०३ | दैनिक | किंमत : ₹५/-

Sunday, 12 April 2026 | Year : 6 | Issue : 103 | Daily | Rate: Rs. 5/-




**दि. 12 एप्रिल 2026**



1928- महार वतन बील मुंबई कौन्सिल पुढे डॉ. बाबासाहेबांनी सादर केले.

1990- डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या तैल चित्रांचे संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये प्रधानमंत्री विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या हस्ते अनावरण संकलन प्रा. यशवंत दुपटे

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणावर सुनावणी

## आंबेडकरी संघटना व कार्यकर्त्यांना सामाजिक न्याय विभागाची महत्त्वाची सूचना

## 15 एप्रिलपर्यंत निवेदन सादर करण्याचे आवाहन

**मुंबई :** राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या संदर्भात 16 व 17 एप्रिल 2026 रोजी महत्त्वपूर्ण सुनावणी होणार असून, इच्छुक आंबेडकरी संघटना व कार्यकर्त्यांनी आपली भूमिका लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Department of Social Justice and Special Assistance Maharashtra यांच्या वतीने जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, इच्छुकांनी 15 एप्रिल 2026 पर्यंत dg-sw@barti.in या ई-मेल आयडीवर आपले निवेदन किंवा अर्ज पाठवावेत. अर्ज सादर करताना संपर्कासाठी स्वतःचा दूरध्वनी क्रमांक नमूद करणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या संदर्भात Anant Manohar Badr (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने आपल्या शिफारशींसह अहवाल 16 मार्च 2026 रोजी शासनास सादर केला आहे. या अहवालाच्या पार्श्वभूमीवर पुढील कार्यवाहीसाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.




सुनावणीचे ठिकाण, वेळ व इतर तपशील संबंधित अर्जदारांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येणार असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील विविध आंबेडकरी संघटना, सामाजिक कार्यकर्ते व अभ्यासकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून आपली मते मांडावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.




## दीक्षाभूमीवरील 14 एप्रिलचा प्रबोधन कार्यक्रम रद्द

**नागपूर :** दीक्षाभूमी येथे दरवर्षी आयोजित केला जाणारा 14 एप्रिलचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रबोधन कार्यक्रम यावर्षी रद्द केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती समितीच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत होता. दरवर्षीप्रमाणे बौद्ध, ख्रिस्ती, मुस्लिम, शीख धर्मीयांसह विविध समाजघटकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग या कार्यक्रमात असतो.

यावर्षी 14 एप्रिल रोजी सायंकाळी व्याख्यान कार्यक्रम आयोजित केला होता. मात्र, स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुराई ससाई यांनी परवानगी नाकारल्याने हा कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती समितीतर्फे देण्यात आली.

या कार्यक्रमात 'राष्ट्रनिर्मितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान' या विषयावर मार्गदर्शन होणार होते. प्रमुख वक्ते म्हणून निरंजन टकले (नाशिक) तसेच डॉ. अनंत राऊत (नांदेड) यांची उपस्थिती अपेक्षित होती. विचारपीठावर डॉ. साजिदा खान (नागपूर) आणि माजी महासंचालक आर. डी. आझाद यांचीही उपस्थिती राहणार होती.

मात्र, कार्यक्रम रद्द करण्यात आल्याने नागपूर शहरातील नागरिक व बौद्ध बांधवांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन समितीतर्फे केले आहे.

पत्रकार परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी समितीचे डॉ. सूचित बागडे, डॉ. एस. बी. गेडाम, डॉ. अशोक उरकुडे, डॉ. प्रदीप आगलावे, राजेश लोखंडे, प्रा. घनश्याम धाबर्डे, सुरेश तामगाडगे व राजकुमार कोसे यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.










“ तुमचे काम तुमचे ओळख बनते.
म्हणून कामातून उत्कृष्टता दाखवा... ”



# समाजवादी, राज्य समाजवादी सांस्कृतिक क्रांती




समाजवाद ही जीवन जगण्याची पद्धती आणि शासन नीती आहे. हे समजून घेण्यासाठी आपण भांडवलशाही आणि ब्राम्हणशाही संस्कृती डोळ्यासमोर ठेवावी. अगदी या दोन्ही संस्कृतिच्या उलट समाजवादी संस्कृती आहे. शोषण नाकारणारी ही पद्धती आहे. 'जगा आणि जगू द्या' अशी ही जीवन पद्धती आहे.

समाजवाद सर्व प्रकारच्या विषमतेचा विरोध करते. आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कोणतीही विषमता समाजवादाला मान्य नाही. संपतीचे असे वितरण नको जे विषम प्रमाणात असेल ज्यामुळे गरीब आणि श्रीमंत असे दोन वर्ग निर्माण होतील आणि श्रीमंत लोक गरीब वर्गाची पिळवणूक करतील. त्यात कुणीच कोणावर अन्याय करणार नाही. प्रत्येकाला विकासाची संधी उपलब्ध करून दिल्या जाईल. उदाहरण म्हणून शिक्षण घेऊ. श्रीमंत हे चांगल्या आणि गरीब हे मागास शाळेत शिकतील असे न होता सर्वांना एकाच शाळेत शिक्षण मिळेल. शेतकरी व मजूर यांना त्यांचे घामाचे दाम न्याय्य पद्धतीने मिळेल. उद्योगाचे राष्ट्रीयकरण होईल. त्यामुळे कामगारांचे मालक वर्ग रक्त शोषून श्रीमंत होणार नाही. ही थोडक्यात आर्थिक संस्कृती झाली. याचा दैनंदिन जीवनात व्यक्ती हा समाजवादी कसा असेल. त्याचे घरी, शेतात, कार्यालयात किंवा दुकानात, शाळेत मजूर आणि कामगार जर असतील तर ते त्यांना मोबदला देताना उचित व न्याय्य पद्धतीने मोबदला देतील. त्यांचेसोबत समानतेचा व्यवहार केला पाहिजे. त्यांचा सन्मान राखल्या गेला पाहिजे. त्यांची पिळवणूक होणार नाही आणि त्यांचे हक्क, अधिकार, सुरक्षा यांची रक्षा करण्यात आली पाहिजे. ही आर्थिक बाब झाली. सामाजिक बाबतीत समाजवाद हा जातीवाद व चातुर्वर्ण समाज व्यवस्था नाकारतो. स्त्री-पुरुष समानतेचा समाजवाद पुरस्कार करतो. म्हणून समाजवादी व्यक्ती आपल्या बायकोसोबत समानतेचा व्यवहार करतो. तो बायकोला आपली दासी किंवा भोगवस्तू समजत नाही. तिचे शरीरावर तिचा अधिकार असतो. तिचे सहमतीशिवाय नवरा आपली इच्छा आपल्या बायकोवर लादत नाही. ही संस्कृती प्रत्येकाचा आत्मसन्मान जपत असते. राजकीय बाबतीत समाजवाद हा प्रत्येक नागरिकास कोणताही भेदभाव न करता राजकीय अधिकार बहाल करते. आज निवडणुकीत श्रीमंत उभे राहून निवडून येऊ शकतात. कारण ते निवडणुकीत पैशाचे जोरावर मत विकत घेतात. गरीब व्यक्ती किंवा मागासवर्गीय व्यक्ती उभा तर राहतो, पण निवडून येऊ शकत नाही. कारण गरीब असल्याने कुणाची मत विकत घेऊ शकत नाही. आर्थिक विषमता असल्यामुळे गरीब मतदार आपले मते विकतात. मागासवर्गीय व्यक्तीला त्याचेपेक्षा उच्च असलेल्या जातीचे लोक त्याला मत देत नाहीत. त्यामुळे ते कधीच निवडून येत नाहीत. माफिया लोक गरीब आणि मागासवर्गीय व्यक्तीला मतदानाचा अधिकार बजावण्यापासून रोखतात. समाजवादी समाजरचनेत सर्व लोक निर्भय होऊन मतदान करतात. गरीब श्रीमंत दरी एवढी रुंद नसते की लोक मत विकतील. आज ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही प्रबळ असलेली नकली लोकशाही सुरू आहे. भारतीय संविधान प्रामाणिकपणे राबवणे आवश्यक होते. परंतु सत्ताधारी ब्राह्मणशाहा आणि भांडवलशाहा यांनी ती अमलात आणली नाही. त्यामुळे भारतात समाजवादी समाजरचना निर्माण झाली नाही. पंडित जवाहरलाल नेहरू समाजवादी होते. परंतु काँग्रेसमध्ये असलेले लोक मात्र समाजवादी नव्हते. त्यामुळे हाती आलेल्या सत्तेचा जेव्हढा उपयोग करता येईल तेवढा उपयोग नेहरुजींनी केला. परंतु तेव्हा काँग्रेसमध्ये सरदार पटेल आणि राजेंद्र प्रसाद गट प्रभावी होता. कारण ते रूढीवादी आणि भांडवलवादी होते. त्यांना सांभाळत सांभाळत नेहरुजी शासन चालवित होते. त्यामुळे त्यांना खूब मर्यादा आल्या होत्या. कदाचित त्यांनी अतिरेक केला असता तर तेव्हाच सत्ता गेली असती. सरदार पटेल प्रधानमंत्री झाले असते. परिणामतः आज जे मोदी आहेत तेव्हा मोदीचे तेव्हाचे मॉडेल सरदार पटेल होते. त्यामुळे आज जे दिसते ते प्रतिगामित्व तेव्हाच हावी झाले असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्य समाजवाद सांगितला. त्यात फार फरक नाही. पण फरक एवढाच आहे. त्यात समाजवाद कायद्याने बंधनकारक करण्यात येते. शिक्षणाचे, उद्योगाचे, शेतीचे राष्ट्रीयकरण अभिप्रेत आहे. सत्तेने समाजवाद निर्माण करावा असे राज्य समाजवाद सांगतो. बाकी समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, लोकशाही, धर्मनिरपेक्षता हे सर्व समान मुद्दे आहेत. आज आपल्या हाती सत्ता नाही असली तरी समाजवाद आणि राज्य समाजवाद मानणाऱ्या लोकांनी आपल्या व्यक्तिगत जीवनात समाजवादी मूल्यांचे आचरण केले पाहिजे. ती संस्कृती निर्माण झाली पाहिजे. यात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, राजकारणात धर्मनिरपेक्षता, लोकशाही मूल्य जपायला पाहिजे. स्त्रीपुरूष समानता आचरणात आली पाहिजे. विज्ञानवाद, बुद्धी प्रामाण्यवाद संस्कार झाला पाहिजे. हा संस्कार बहुसंख्य लोक आचरणात आणली तरच सांस्कृतिक क्रांती होते. त्या संस्कारात असलेले मतदार तसेच उमेदवार निवडून देतात. आज तसे समाजवादी संस्कार असलेले लोक आहेत पण फार अल्प प्रमाणात. म्हणून राजकारणात देखील अल्प प्रमाणात आहेत. ते बहुसंख्य झाले पाहिजे. तसा विचार, तसा धर्म, तशा रूढी, परंपरा, सण उत्सव झाले पाहिजेत. त्यामध्ये समाजवादी, साम्यवादी, राज्य समाजवादी कमी पडलेत. हे मान्य करून ती कमी भरून काढण्यासाठी वेळ न दवडता प्रयत्न केले पाहिजेत. ■■

लेखांक 152



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

## मानवतेची समताधिष्ठित संस्कारमूल्ये रुजविणारा

# बावीस प्रतिज्ञा

बौद्धधर्म हा मानवकेंद्री असून सामाजिक समता, मानव उन्नतीचा सम्यक मार्ग दाखविणारा सुधारक धर्म आहे. आज जगाला युद्ध नको बुद्ध हवा. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टो. 1956 रोजी धम्मदीक्षा घेऊन जागतिक स्तरावर सामाजिक समतेसाठीचे मानवमुक्तीचे क्रांतिकारक पाऊल टाकले. नवबौद्धांची समकालीन आव्हाने लक्षात घेऊन, त्याबरहुकूम अनुयायांना 22 प्रतिज्ञा दिल्या. या प्रतिज्ञा बौद्धांसाठी सांस्कृतिक रक्तवाहिन्या आहेत. धर्मांतरावेळी त्यांनी संपूर्ण भारत बौद्धमय करीन ही प्रतिज्ञा व संकल्प सोडला. भारतीय राज्यघटनेच्या पानापानांत डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची पेरणी केली. संविधानाचा मूलाधार स्वातंत्र्य, समता, बंधुता आहे. धर्मांतराच्या काही महिन्यांपूर्वी, 23 एप्रिल 1956 रोजी हिंदू धर्माची त्यागप्रतिज्ञा त्यांनी जाहीर केली होती. देवदेवता नाकारणाऱ्या तीन प्रतिज्ञांचा हा जाहीरनामा होता. नंतर धम्मदीक्षा सोहळ्याला 22 प्रतिज्ञांचे प्रतिज्ञापत्र सादर केले. 22 प्रतिज्ञांचे तंतोतंत पालन म्हणजे बौद्ध होय. पूर्वीच्या महार समाजात आमूलाग्र बदल झाला आहे. बौद्ध वस्तीतल्या विहारात धम्मपालन आचरणाचे शिबिर आयोजित केले जातात. त्रिशरण, पंचशील, अष्टांग मार्गाचा अवलंब केला जातो, तथापि 22 प्रतिज्ञांचे पालन करण्यापासून समाज दुरावतो आहे. राजकीय व्यवस्थेला वश होऊन सामाजिक ध्रुवीकरण होते आहे. हिंदू-बौद्ध धर्माची भेसळ समाजाला बौद्ध बनण्यातला प्रमुख अडसर ठरते आहे. सत्तेत वाटेकरी होण्यासाठी नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या तत्वांना हरताळ फासताहेत. 22 प्रतिज्ञा घराघरात व घरातील प्रत्येक सदस्यांना अवगत होण्यासाठी 'कवितामय बावीस प्रतिज्ञा' हा कवयित्री संघमित्रा गेडाम यांचा कविता संग्रह प्रकाशित झाला आहे. बौद्ध ही विस्तृत व व्यापक संकल्पना आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या 'कास्टस् इन इंडिया', 'निहेलेशन ऑफ कास्ट', 'दी बुद्ध अँन्ड हीज धम्म' या ग्रंथांचे वाचन अनिवार्य आहे. या सर्व ग्रंथांचा वैचारिक प्रवास 22 प्रतिज्ञांमधूनच प्रतिबिंबित झालेला आहे. या प्रतिज्ञा काव्य रूपात सोप्या भाषेत परंतु मूळअर्थाला स्पर्श न करता, समाजातील सर्व घटकांना समजतील अशा शब्दांत काव्यसंग्रहाच्या गेयपुर्ण माध्यमातून कवयित्री जे संघमित्रा गेडाम यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत.




सुप्रसिद्ध आंबेडकरी विचारवंत यशवंत मनोहर यांनी ब्लर्बमध्ये काव्यसंग्रहाचा अचूक वेध घेतला आहे., '22प्रतिज्ञा ही एकूणच विश्वधमम्माची प्रतिभावंत उद्देशिका आहे. धम्माचा सर्वगामी महाबोधी वृक्ष या प्रतिज्ञा मध्येच वास्तव करतो आहे'. धम्म चळवळ सन्मार्गावर प्रवाहीत ठेवण्यासाठी हा काव्यसंग्रह उद्बोधक ठरेल असा विश्वास वाटतो. कवितामय बावीस प्रतिज्ञा म्हणजे धम्म उपासकांसाठी काव्यात्म प्रकाश शलाका आहे. दीप ध्वज कोसोदे यांची प्रस्तावना गेडाम यांच्या धम्म कार्याची धडपड अंकीत करते. 1 ते 6 प्रतिज्ञा देवदेवतांचे दैवी अस्तित्व नाकारुन विज्ञाननिष्ठ सत्यशोधक समाज निर्मितीसाठी प्रेरणा देतात. कर्मकांड व अंधभक्तीचे जाहीर खंडन करताना गेडाम लिहितात, '22 प्रतिज्ञा आहे विचार समाज जागृतीचा नारा अंधश्रद्धा नाकारून बुद्ध धम्म स्वीकरा' अंधश्रद्धेच्या थोतांडापासून मुक्ती देणारा हा जगतश्रेष्ठ धम्म आहे. आठव्या प्रतिज्ञेच्या मूलस्थानी हा विचार अग्रणी आहे, 'क्रिया, कर्मकांड ब्राम्हणी उच्छाद माजवी आणीबाणीच्या लोभाने मनुष्य प्राण्याला फसवी' (पृ.21) माणसाला गुलाम बनविणाऱ्या ब्राम्हण कुटनितीचे उच्चाटन समताधिष्ठित मानवता उजागर करण्याचा, माणूस निर्मितीचा सद्धम्म म्हणजे बौद्ध धम्म. नवव्या प्रतिज्ञेत मनुष्य मात्राच्या सामाजिक समतेसाठी समसमान तत्व अधोरेखित केले आहे. 'स्पृश्य- अस्पृश्य स्त्री भेदाभेदी मानवतेच्या इथे तोडल्या भिंती. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता रूजण्या येथे बुद्धच सांगाती' (पृ.23) कवयित्रीने जनसामान्यांच्या भाषेतील सोप्या रचनेत केलेली मांडणी लक्षवेधी ठरली आहे. प्रतिज्ञा 13 ते 17 पंचशील अनुपालन, आचरणातून सम्यक जीवनमार्ग अनुसरणाची संहिता दिलेली आहे. शेवटी 18 ते 21 प्रतिज्ञांमध्ये सदाचारी, सदाचरण जीवनमूल्याची केलेली कसदार पेरणी जीवन पूर्ण तृप्त करण्यासाठी उचित दिशादर्शन करणारी आहे. प्रत्येक प्रतिज्ञेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षा सोहळ्यात अभ्यासपूर्ण भाष्य केलेले आहे. हा बुद्धिजीवी लोकांना बुद्धांकडे नेणारा सर्व समावेशक राजमार्ग आहे. या भारत खंडात बुद्ध विचारांतून मन्वंतर घडेल याची खात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाषणात दिलेली आहे. शेवटी 22 वी प्रतिज्ञा बुद्ध शिकवणीनुसार वागणूक, वर्तन चोख ठेवण्याची निर्णायक प्रतिज्ञा आहे, हा संदेश अंगी बिंबविण्याचे आवाहन कवियत्री करतांना व्यक्त होते, 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय हाच बुद्धांचा संदेश मंगल मैत्री करून स्विकारु बाबांचा आदेश' (पृ.35) बुद्ध धम्म म्हणजे स्वयं प्रकाशित होणे. मानवी जीवनाचे अंतिम साफल्य मोक्षप्राप्ती, आसक्त मोहमयी जंजाळातून मुक्ती मिळवण्यासाठी पूर्वीच्या कुप्रथा, अंधश्रद्धांचे निर्दालन अटळ ठरते. सामाजिक समता हे अमोल अस्त्र संविधानकारांनी आरक्षण रूपाने दिले. आज राजकीय पटलावर जातीपातीच्या भिंती अभेद्य करुन माणसाला गुलाम बनविणाऱ्या धर्ममार्तंडी तटबंदी मजबूत करण्यासाठी अशा दंभाला राजाश्रय मिळत आहे, आरक्षणाचे अस्त्र नष्ट करून सर्व हारा समाज पुन्हा वर्णाधिष्ठित अमानुष व्यवस्थेत भरडण्याचे षडयंत्र रचले जात आहे. जातिभेदाची मुळे मूळासकट उखडून टाकण्यासाठी बौद्ध धम्म हा एक रामबाण उपाय आहे. यासाठी हा काव्यसंग्रह बोलीभाषेसह प्रमुख भाषांमध्ये अनुवादित व्हायला हवा. लोकशाही जिवंत राहण्यासाठी गेडाम यांच्या बावीस प्रतिज्ञा काव्यसंग्रहाचे दस्तऐवजरूपाने वाचन अनिवार्य. काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ हीच जाणीव चिरंतर करून देते. हा संग्रह कुटुंबात सामाहिक वाचवा असे आवाहन करतो. आंबेडकरी साहित्य निर्मितीसाठी कवयित्री संघमित्रा गेडाम यांना मंगलमय शुभेच्छा देतो! ■■

साहेबराव मोरे
मो. 9404048601

समीक्षण : विद्रोही कवी साहेबराव मोरे
मो.9404048601
कवितामय बावीस प्रतिज्ञा : काव्यसंग्रह
कवयित्री : संघमित्रा गेडाम
प्रकाशन :बोधीपर्व, संभाजी नगर




## नाटककार प्रभाकर दुपारे यांची जिद्दी रंगयात्रा

# संघर्षातून उभी राहिलेली दलित रंगभूमीची वैचारिक मशाल

मराठी रंगभूमीच्या विस्तीर्ण पटावर अनेक प्रवाह एकत्र वाहताना दिसतात; पण त्या प्रवाहांमध्ये समाजाच्या तळागाळातील वेदना, अस्मिता आणि परिवर्तनाची हाक प्रभावीपणे मांडणारा प्रवाह म्हणजे दलित रंगभूमी. या प्रवाहाला विचारांची धार देणारे, संघर्षातून स्वतःची ओळख निर्माण करणारे आणि आपल्या लेखणीतून सामाजिक वास्तवाला भिडणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रभाकर दुपारे. त्यांचा संपूर्ण जीवनप्रवास हा प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उभ्या राहिलेल्या जिद्दीचा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आलेख आहे.

13 डिसेंबर 1956 रोजी जन्मलेले प्रभाकर दुपारे यांचे बालपण आणि आयुष्याचा प्रारंभिक टप्पा हा संघर्षमयच होता. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मर्यादांच्या चौकटीतून वाट काढताना त्यांनी शिक्षण, विचार आणि लेखन यांना आपली शस्त्रे बनवले. या संघर्षानेच त्यांच्या संवेदनशीलतेला आकार दिला आणि त्यांच्या लेखणीतून उमटणाऱ्या प्रत्येक शब्दामागे वास्तवाचे गडद भान निर्माण झाले. त्यामुळेच त्यांच्या नाटकांमध्ये कृत्रिमता नसून जिवंत अनुभवांची ताकद दिसून येते. पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी लोकमत या दैनिकात वरिष्ठ उपसंपादक म्हणून तब्बल 23 वर्षे काम करत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. पत्रकार म्हणून काम करत असतानाच त्यांनी सांस्कृतिक चळवळींना विशेषतः नाट्य चळवळींना बळ देण्याचे काम केले. 'दखल' या सदराच्या माध्यमातून त्यांनी अनेक उपेक्षित, ग्रामीण आणि दलित नाट्यप्रयोगांना मुख्य प्रवाहात स्थान मिळवून दिले. ही केवळ पत्रकारिता नव्हती, तर एक सामाजिक बांधिलकी होती. प्रभाकर दुपारे यांची खरी ओळख नाटककार म्हणून अधिक ठळक होते. 1978 साली साता समुद्रा पलिकडे या नाट्यसंग्रहापासून सुरू झालेली त्यांची लेखनयात्रा उत्सव, झुंबर, रमाई, कलिंग विजय अशा प्रभावी नाटकांपर्यंत पोहोचते. त्यांच्या लेखनात दलित समाजाच्या वेदना, अन्याय, संघर्ष आणि आत्मसन्मान यांचे जिवंत चित्रण दिसते. विशेषतः 'रमाई' हे नाटक त्यांच्या सर्जनशीलतेचे शिखर ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अत्यंत भावनिक आणि मानवी पैलू उलगडणारे हे नाटक केवळ रंगभूमीवरच नव्हे, तर समाजमनातही खोलवर पोहोचले. 'रमाई' या नाटकाचे भारतात जवळपास एक हजार प्रयोग झाले, तसेच इंग्लंड आणि मलेशिया येथेही त्याचे प्रयोग सादर झाले ही बाब त्यांच्या लेखनाच्या प्रभावाची साक्ष देते. नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठात या नाटकाचा अभ्यासक्रमात समावेश होणे, ही त्यांच्या साहित्यिक योगदानाची मोठी पावती आहे. दलित नाट्य चळवळीतील त्यांचे योगदान विशेष अधोरेखित करावे लागेल. 1995 साली चंद्रपूर येथे झालेल्या दलित नाट्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी नेतृत्व केले. त्यांच्या नाटकांमध्ये केवळ कलात्मकता नसून सामाजिक प्रश्नांची ठोस मांडणी आणि परिवर्तनाची प्रेरणा आहे. त्यामुळेच दलित रंगभूमीवर त्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. या चळवळीबद्दल त्यांच्याशी चर्चा करताना आपण फक्त ऐकावे आणि त्यांनी बोलावे असा अभ्यासपूर्ण प्रत्यय मी स्वतः अनुभवला आहे. त्यांच्या कार्याचा विस्तार संघटनात्मक आणि प्रशासकीय पातळीवरही दिसतो. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नागपूर शाखेचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी तीन वर्षे कार्य केले, तसेच मध्यवर्ती नियामक मंडळावर पाच वर्षे सक्रिय भूमिका निभावली. राज्य नाट्य महोत्सव आणि कामगार नाट्य महोत्सवात त्यांनी परीक्षक म्हणून सातत्याने योगदान दिले. प्रोग्रेसिव्ह थिएटर या संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी नाट्य चळवळीला नवी दिशा दिली. महाराष्ट्र रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर त्यांनी दीर्घकाळ सदस्य म्हणून कार्य करत नाट्यप्रयोगांच्या गुणवत्तेला आकार दिला. त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाची दखल अनेक पुरस्कारांनी घेतली आहे. रमाई या नाटकासाठी त्यांना जीवक महात्मा फुले राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. तसेच नाना जोग स्मृती नाट्य लेखन पुरस्कार (2013) आणि वैदर्भीय नाट्य लेखन पुरस्कार (2002) यांसारख्या मानाच्या पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला. 2017 साली महात्मा फुले अकादमीचा जीवनगौरव पुरस्कार आणि सामाजिक न्याय विभागाचा समाज उत्थान पुरस्कार त्यांच्या कार्याच्या व्यापकतेची साक्ष देतात. आंबेडकरी साहित्य चळवळीतल्या योगदानासाठी त्यांना 2014 मध्ये मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. त्यांच्या कार्यावर संशोधन होणे, 'रमाईकार प्रभाकर दुपारे यांची नाट्यसृष्टी' हे पुस्तक प्रकाशित होणे, तसेच 'प्रभाकर दुपारे समग्र नाटक' या ग्रंथाला विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार मिळणे, या गोष्टी त्यांच्या साहित्यिक उंचीची जाणीव करून देतात. नाटकांबरोबरच त्यांनी 'सुभेदार' (रामजी आंबेडकर यांचे चरित्र) आणि 'बुद्धमय थायलंड' हे प्रवासवर्णन लिहिले. लघुपट लेखन आणि निर्मितीतही त्यांनी 'ओंजळभर पाणी', 'सूर्योदय', 'सयाजीराव गायकवाड' यांसारखी कामे केली. अलीकडे त्यांनी 'दुसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर' या नाटकाचे लेखन, निर्मिती केली असून त्याचे प्रयोगही रंगभूमीवर सादर झाले आहेत. नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाच्या निवड समितीवर सदस्य म्हणून त्यांनी केलेले कार्य हे त्यांच्या योगदानाची राष्ट्रीय पातळीवरील दखल आहे. प्रभाकर दुपारे यांचा जीवनप्रवास हा केवळ एका नाटककाराचा प्रवास नाही, तर तो संघर्षातून उभ्या राहिलेल्या विचारांचा, सामाजिक जाणिवांचा आणि परिवर्तनाच्या ध्यासाचा प्रवास आहे. त्यांनी दलित रंगभूमीला केवळ शब्द दिले नाहीत, तर दिशा दिली, एक वैचारिक अधिष्ठान दिले. अशा या जिद्दी, अभ्यासू आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या प्रभाकर दुपारे यांची रंगयात्रा ही मराठी दलित रंगभूमीच्या इतिहासातील एक तेजस्वी, प्रेरणादायी आणि मार्गदर्शक पर्व ठरते. ■■

अजय धवने




# दलित... प्रजा की नागरिक.. ?

'मला मायभूमी नाही.' पुणे करार चर्चेदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा गांधीजींशी संवाद साधताना उच्चारलेले हे वाक्य आहे. हजारो वर्षे या व्यवस्थेने धार्मिक कायद्याखाली (मनुस्मृती) अस्पृश समाजाला ज्याप्रकारे वागणूक दिली आहे त्या मागची चीड आणि उद्विग्नता यातून डॉ. आंबेडकर व्यक्त करीत होते. संवैधानिक कायद्याचे राज्य स्थापन होऊन आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर सुद्धा यात अमुलाग्र बदल झाल्याचे चित्र नाही. आजही दलित, वंचित घटकांकडे हिंदुत्वाच्या प्रयोगशाळा असलेल्या राज्यातील तथाकथित उच्चजातीय त्याच दृष्टिकोनातून बघतात, वागणूक देतात, अन्याय-अत्याचार करतात. त्याला अटकाव करण्याच्या राजधर्माचे पालन होतांना दिसत नाही. न्यायिक व्यवस्थेत अशी प्रकरणे वर्षांनुवर्षे चालत राहतात. त्यामुळेही अश्या मानसिकतेच्या लोकांच्या मनोबलात वाढ होते. तर अन्याय सोसलेल्या घटकाचे खच्चीकरण होते. दलित व्यक्तीने साधी बुलेटगाडी चालवली, मिशी ठेवली, घोड्यावर वरात काढली या सबबीखाली मारहाणीच्या घटना आपण वाचत असतो. दलित मुलांना शाळेतील माठात पाणी पिण्यास बंदी, दलित महिलांनी तयार केलेले शाळेतील मिड डे मिल (मध्यान्ह भोजन) करण्यास नकार अश्या बातम्या येत असतात. गावाच्या प्रवेशद्वाराला डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्यास विरोध, पुतळ्यांची विटंबना या घटना जातीय मानसिकता किती रुजली आहे त्याच्या निदर्शक आहेत. आंतरजातीय आणि धर्मीय विवाहातील दलित मुलांच्या प्रगत महाराष्ट्रातही हत्या झाल्याची उदाहरणे आहेत. तर काही राज्यातील अश्या प्रकारच्या घटनांची नोंद, दखलही घेतली जात नाही. धार्मिक बंदिस्त चौकटीचा पगडा शिक्षणाच्या प्रसारानंतरही लोकांच्या मानसिकतेत व्यापक प्रमाणात कायम आहे. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती गवई यांच्यावर चप्पल फेकली गेली ती याच वर्गीय मानसिकतेची द्योतक होती. रायबरेतील हरिओम वाल्मिकीचा झुंडबळी, हरियाणाच्या उच्चपदस्थ पोलिस अधिकाऱ्याची आत्महत्या या काही घटना मनाच्या आणि मेंदूच्या कोपऱ्यात दडून असलेल्या जातीय द्वेषाचीच उदाहरणे आहेत.

या घटनांच्या विश्लेषणात एक बाब स्पष्ट होते की दलितांना बरोबरीचे मानण्यास समाजाचा मोठा वर्ग तयार झाला नाही. 'माणूस' म्हणून या वर्गाचा दर्जा अश्या समुदायाच्या लेखी आजही हिनत्वाच्या पातळीवरच आहे. ही एक प्रकारची राजेशाही काळातील सरंजामी मानसिकता आहे. या मानसिकतेत खालच्या वर्गाला नेहमी प्रजा म्हणून गृहीत धरले जाते. प्रजेला राजेशाही काळात जसा अधिकार नव्हता किंवा रहात नाही. तसा एका वर्गाचा दृष्टिकोन आधीपासून होता आणि आता त्यात राजकीय वातावरणामुळे अधिक भर पडली आहे. म्हणूनच पूर्वापार सामाजिक व्यवस्थेत एकाच वर्णात असलेले लोकही जातीय उच्च - नीच या भावनेतून व्यवहार करतात. जात अशाप्रकारे मेंदूत घट्ट बसली आहे आणि त्याची प्रतिक्रिया या घडणाऱ्या घटना आहेत. अशी वर्गीय मानसिकता राजकीय पोळी शेकण्यासाठी सोयीची असल्याने तिला खतपाणी दिले जाते. पण, सामाजिक वीण मात्र उसवली जाते याचे भान येणे अगत्याचे आहे. भारतीय संविधानाने सर्वांना नागरिकत्वाचा समान दर्जा दिलेला आहे. त्याचे सामाजिक, राजकीय आणि इतर अधिकार सुरक्षिततेची हमी संविधानाने दिलेली आहे. ज्या वर्गाला संविधान तेंव्हाही मान्य नव्हते आणि आजही उघडपणे मान्य नाही हे म्हणण्याचे धाडस नसलेला वर्ग दलितांना बरोबरीचे नागरिक मानण्यास तयार नाही हे वास्तव आहे. छोट्या छोट्या जातीय घटकात वसलेली उच-निचतेची भावना शिक्षणाने हद्दपार होऊ शकली नाही ही शोकांतिका आहे. विस्कळीत दलित-आंबेडकरी राजकीय नेतृत्व, एक वाक्यता नसलेल्या दलित चळवळी, माध्यमांची एकांगी भूमिका, प्रशासन व्यवस्थेत अनावश्यक राजकीय हस्तक्षेप, प्रशासनातील पूर्वग्रह दृष्टिकोन ही दलितांवरील अत्याचाराची ठळक कारणे आहेत. काही दशकापूर्वी इकबाल या कवीने दलितांची स्थिती या शब्दात वर्णन केली. 'आह शुद्रोंके लिये हिंदुस्ता गमखाना है..
दर्दे इन्सानिसे इस बस्तिका दिल बेगाना है..'
याला यथार्थ ठरवणाऱ्या घटना घडतात तेंव्हा स्पष्टपणे लक्षात येते की, समाज म्हणून आपली मानसिकता अजूनही परिपक्व झाली नाही. संवैधानिक संस्थानी संविधानात निर्देशित नैतिक आणि प्रामाणिक भूमिका पार पाडून अश्या घटकांना आळा घातला तरच चित्र बदलू शकेल. चवदार तळे सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष सुरू झाले आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कार्यक्रम संपन्न होतील. या निमित्ताने महामानवाचे स्मरण करतांना त्यांना अपेक्षित समता, बंधूता असलेला समाज निर्मितीचा प्रयत्न समर्पक अभिवादन असेल. ■■



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

## तासिका प्राध्यापकांचे स्वप्नभंग होणे अजूनही का थांबत नाही... याचे उत्तर शोधणारी विजया मारोतकर यांची कादंबरी

# अजूनही...

आ. विजयाताई मारोतकर यांनी लिहिलेली 'अजूनही' कादंबरी घड्याळ तासिकावर काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या जीवनपटावर आधारलेली आहे. यात तासिका प्राध्यापकांच्या जीवनातील होरपळ, व्यथा दिसून येते. शिक्षण क्षेत्रात एवढी प्रगती झाली असताना तासिका प्राध्यापकांचा प्रश्न ऐरणीवरच आहे. वेतन तर नाहीच नोकरीची पण शाश्वती नाही. तसेच कुठलेही स्वातंत्र्य नाही, डोक्यावर सतत असलेली टांगती तलवार. समाजात चार घरापलिकडे असलेल्या या विषयाची दखल घेत शासन दरबारी हा ज्वलंत प्रश्न पोहोचविण्याचा प्रयास करणारी ही कादंबरी होय. आपले आयुष्य मार्गावर येईल अशी आशा प्राध्यापकांना असते. ही फक्त एक प्रेम कथाच नाही तर, तासिका प्राध्यापक असलेल्या बुद्धिमान अजय व आशावादी पूनमच्या जिद्दीची संघर्ष कथा आहे. तासिका प्राध्यापकांचा जगण्याचा प्रश्न मार्मिक आहे. परंतु या भयानक प्रश्नाने समाज व्यथित होतो. अतिशय ओघवती व सोप्या भाषेमुळे लेखिकेने वाचकाला शेवटपर्यंत बांधून ठेवले. आता पुढे काय होणार? अशी उत्सुकता लागून रहाते. वाचताना त्यांच्या प्रगल्भतेची जाणीव होते. जोपर्यंत मनाला आशेचे पंख आहेत. हृदयामध्ये ध्येयाचे वादळ, अंतःकरणात जिद्द आहे, भावनांना फुलांचे गंध आहे, डोळ्यासमोर खुले आकाश आहे, तोपर्यंत येणारा क्षण आपलाच आहे. अशा भावना प्रगट करणारी पूनम रेखाटलेली आहे. निर्मळ नाती केवळ दाखविण्यासाठी नसतात, तर त्या मनातून असतात. तासिका प्राध्यापकांच्या जीवनाचा निःशब्द प्रवाह अनुभवाला येतो. दैनंदिन जगण्यात दिसणारे साधे प्रसंग, नात्यांमधील न बोललेले ताण, मनासारखे घडत नसल्यामुळे मनात खोलवर साचत गेलेल्या वेदना नैसर्गिकपणे उभ्या राहतात. कादंबरी वाचताना असे वाटते की तो प्रसंग प्रत्यक्ष डोळ्यासमोर घडत आहे असा भास होतो.




कादंबरी वाचताना अजय सोबतचे प्रेम बघून लवकरच यांचे जीवन सुखकर व्हावे असे वाटते. पण प्रेमाचा अपेक्षाभंग, प्रेमाची तळमळ दिसून येते. जीवन जगायचे असेल तर आर्थिक पाठबळ आवश्यक आहे. पूनमला तिच्या विषय निवडीमुळे चांगली नोकरी लाभते आणि ती नशीबवान ठरते. पूनमला कुटुंब सौहार्द, नातीगोती जपणे, मैत्रीचे स्नेहबंध जुळवणे हे मनापासून आवडते. परंतु अजय यात अपयशी ठरतो. त्याच्यावर घरच्या जबाबदाऱ्यापण असतात. अखेर अजय प्रेमाचा बळी देऊन अजयने संस्थाचालकाच्या न शोभणाऱ्या मुलीशी लग्न करून त्या दोघांच्या प्रेमाचा बळी दिला. तिच्याशी लग्न म्हणजे होणाऱ्या तीव्र वेदनेचे लेखिकेने फार NI चित्रण केले आहे. आयुष्यातील गोड गुलाबी स्वप्न तुटले. विजयाताईना कादंबरी पूर्ण करायला सहा वर्ष लागली. या काळात त्यांनी अनुभव, निरीक्षण खूप केले. पूनमच्या जीवनातील संघर्षाचे चित्रण अंतर्मुख करणारे आहे. इतका संयम दाखवलेला आहे की वेदना प्रत्येक वाक्यात जाणवते. कादंबरीचे भाव विश्व दीर्घकाळ मनात जिवंत राहते. जेव्हा पूनमला अजयच्या लग्नाचे कळते तेव्हा आयुष्यातल्या या प्रचंड वादळाने पुनम उद्ध्वस्त होते. तिचे स्वप्नभंग झाल्याने ती सैरभैर होते. तिची जगण्याची उमेद संपते. परंतु सोशिक समजदार असल्यामुळे समाजसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद पूनमने जोपासले. अनेक ठळक प्रसंगासह बारीक सारी घटनांनी लेखिकेने आठवणींच्या सूक्ष्म कुंचल्याने फार सुंदर पुनम रेखाटलेली आहे. प्रेमभंगामुळे तिचे मन जखमी होते. तिचा पराभव स्वीकारते. परंतु प्रचंड ताकतीने आयुष्याला सामोरे जाते, ती तावुन सुलाखुन निघाली. पूनमच्या जीवनातील संघर्षाचे चित्रण अंतर्मुख करणारे आहे. इतका संयम दाखविला आहे की वेदना प्रत्येक वाक्यात जाणवते कादंबरीचे भाव विश्व दीर्घकाळ मनात जिवंत राहते. पुनम पासून सुरू झालेली कथा गुंजनपर्यंत कशी पोहोचली कळलेच नाही. अनाथाश्रमात वाढलेली पूनम अखेर अनाथ गुंजनवर प्रेमवर्षाव करून आपले स्वप्न जीवन सार्थक करते. ती गुंजनला आपल्या मायेच्या पदरात घेऊन मायेची ऊब देते. परंतु पुढे गुंजन व परिमलची प्रेम कथा बघून नियती चक्र अजय व पूनमपर्यंत येऊन थांबते. पण अजय व पूनमच्या प्रेमाचे काय? त्यांचे आयुष्य तर असेच व्यर्थ गेले! त्यांच्या हातात काय लाभले? हा प्रश्नच आहे. वाचताना शेवटी सहानुभूतीच वाटते. 275 पृष्ठांची ही कादंबरी चाहत्यांना, वाचकांना खजिनाच ठरली आहे. भावना प्रगट करण्यासाठी अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या लेखिकेने त्यांच्या कवितामध्ये वापरलेल्या आहे. त्यामुळे तो उत्कर्ष बिंदू वाटतो. डॉ. श्रीपाल सबनीस सरांची पाठराखण लाभल्याने कादंबरीचे उंचावर गेलेली आहे. मुखपृष्ठ आकर्षक असून अतिशय संवेदनशील चित्रण केलेले आहे. मुखपृष्ठ खूप बोलके आहे. मानधन नको, दरमहा निश्चित वेतन द्या हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. अतिशय हळवे संवेदनशील मन आणि सूक्ष्म निरीक्षण क्षमता असलेल्या विजयाताईंनी ही कादंबरी लिहिलेली आहे. त्यांच्या कार्याला मनापासून शुभेच्छा. अशाच अनेक कादंबऱ्या वाचकांसाठी त्यांनी लिहाव्यात अशी अपेक्षा करते. ■■



प्रणोती कळमकर
मो. 9834209457

कादंबरी : अजूनही...
लेखिका : विजया मारोतकर
पृष्ठसंख्या : 275
प्रकाशक : डिंपल पब्लिकेशन, वसई, मुंबई
मुल्य : 450/-
उपलब्ध : ॲमेझॉन आणि सर्वत्र 9823706590

“ चूक होणे स्वाभाविक आहे,
पण ती सुधारणे शहाणपण आहे... ”



# जयंती बॅनर अनावरणातून सामाजिक संदेश

1 एप्रिल भारतीय रिझर्व बँक स्थापना दिनापासून 14 एप्रिल जयंतीपूर्व तयारीच्या पार्श्वभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून यंदाची जयंती साजरी करण्याला विधायक दिशा देण्यात आली आहे. जयंतीनिमित्त विशेष बॅनरचे अनावरण करून समाजप्रबोधन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. विशेष म्हणजे, डीजे आणि महाभोजनमुक्त जयंती साजरी करण्याचा संकल्प करण्यात आल्याने या उपक्रमाची सर्वत्र चर्चा होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येक व्यक्तीवर मोठे ऋण आहे. ‘आज जे काही प्राप्त झाले, ते भीमा तुझ्यामुळे’ अशी भावना विशेषतः महिलांनी व्यक्त केली आहे. तरुणाईसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रेरणादायी मार्गदर्शक असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले. यंदाच्या जयंती बॅनरवर कोणत्याही आयोजकाचा फोटो न लावता फक्त डॉ. बाबासाहेबांचे विचार इंग्रजी भाषेत मांडण्यात आले आहेत. इंग्रजी भाषेचे महत्त्व अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न असल्याचे दिसून आले. काही ठिकाणी मराठी व हिंदी भाषेतही बॅनर लावण्यात आले आहेत. दरम्यान, महाराष्ट्रातील काही भागांत अलीकडेच वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने वाशिम येथे बॅनर कोसळण्याची घटना घडली. त्यावेळी विजेच्या तारा पडल्यामुळे एका युवकाला विजेचा धक्का बसून त्याचे हात निकामी झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अशा घटना टाळण्यासाठी विजेच्या खांबांचा वापर टाळावा, अशी कळकळीची विनंती आयोजकांनी केली आहे. ‘जीव महत्त्वाचा आहे; जयंती येते आणि जाते, पण जयंतीला गालबोट लागता कामा नये,’ असा भावनिक संदेशही यावेळी देण्यात आला. जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी जपणारे तरुण व विद्यार्थी मोठ्या संख्येने पुढे आले आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार करताना स्वतःचे फोटो न लावण्याचा निर्णय घेत त्यांनी दिखाऊपणावर (चमकोगिरीवर) मर्यादा घातल्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला आहे. जयंती केवळ उत्सव नसून विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनाचा दिवस आहे, या भूमिकेतून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ‘बहिष्कृत भारत’ व महाड सत्याग्रह जन्मशताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमांना ऐतिहासिक आणि वैचारिक अधिष्ठान लाभले आहे. कार्यक्रमाची



सुरुवात विशेष जयंती बॅनरच्या अनावरणाने झाली. बॅनरवर सामाजिक परिवर्तनाशी निगडित विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली होती. उपस्थित मान्यवरांनी जयंती साजरी करण्याची बदलती दिशा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेले ‘बहिष्कृत भारत’ हे वृत्तपत्र उपेक्षितांच्या हक्कांसाठी प्रभावी माध्यम ठरले होते. जन्मशताब्दी वर्षानिमित्त विचारजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. संविधानमूल्ये, सामाजिक न्याय आणि समतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. महाड सत्याग्रह हा सामाजिक समतेच्या लढ्याचा ऐतिहासिक टप्पा असल्याचे नमूद करत वक्त्यांनी समान हक्कांसाठी संघर्षाची प्रेरणा आजही तितकीच महत्त्वाची असल्याचे सांगितले.



**विलास गजभिये**
मो. 9421588901

जन्मशताब्दी निमित्त आयोजित चर्चासत्रांमध्ये तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. जयंतीनिमित्त रक्तदान संकल्प राबविण्यात आला असून अनेक युवकांनी रक्तदानासाठी नोंदणी केली. ‘रक्तदान हेच श्रेष्ठ दान’ या संदेशातून जयंतीला मानवसेवेचे स्वरूप प्राप्त झाले. विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे अधोरेखित करत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देण्यात आली. स्थानिक स्तरावर उद्योग उभारणाऱ्या नवउद्योजकांचा सन्मान करून आत्मनिर्भर समाजनिर्मितीचा संदेश देण्यात आला. रोजगारनिर्मिती ही सामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली असल्याचे मान्यवरांनी सांगितले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करून स्त्री सशक्तीकरणाचा संदेश देण्यात आला. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचा सहभाग अत्यावश्यक असल्याचे नमूद करण्यात आले. गरजू घटकांना मदत करण्यासाठी सामाजिक बांधिलकी निधी संकल्प जाहीर करण्यात आला. सामूहिक सहकार्याच्या माध्यमातून दुर्बल घटकांना आधार देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. जयंतीनिमित्त रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्णांना मानसिक आधार मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. संविधान, सामाजिक न्याय आणि आधुनिक समाजातील आंबेडकरी विचार या विषयांवर परिसंवाद व चर्चासत्र आयोजित करण्यात आले. अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांनी विचारांची देवाणघेवाण केली. यंदाच्या जयंतीचे वैशिष्ट्य म्हणजे डीजे व महाभोजनमुक्त साजरीकरण. अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी कार्यावर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला असून वाचलेला निधी सामाजिक उपक्रमांसाठी वापरण्यात येणार आहे. संपूर्ण कार्यक्रमात युवकांनी स्वयंसेवक म्हणून सक्रिय भूमिका बजावली. सामाजिक कार्यात तरुणांचा वाढता सहभाग आशादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या सर्व उपक्रमांमधून जयंती ही केवळ उत्सव न राहता समाजजागृतीचे प्रभावी व्यासपीठ ठरल्याचे दिसून आले. समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची अंमलबजावणी हीच डॉ. बाबासाहेबांना खरी आदरांजली असल्याचा संदेश देण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित विधायक उपक्रमांच्या माध्यमातून जयंती साजरी करण्याची ही संकल्पना भविष्यात समाजासाठी आदर्श ठरेल, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. ■ ■

# सम्यक संवाद
## ‘बोलत राहिले पाहिजे’




सम्यक संवाद या संकल्पनेवर आधारलेला ‘बोलत राहिले पाहिजे’ हा वैशाली रामटेके यांचा पहिला कवितासंग्रह आंबेडकरी विचारधारेने प्रेरित असून समाज प्रबोधनाची ठाम भूमिका मांडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साहित्यिकांना दिलेला संदेश, उदात्त जीवनमूल्ये साहित्यातून व्यक्त करावीत, उपेक्षितांच्या वेदना जाणून त्यांच्या उन्नतीसाठी लेखणी झटावी, हा या संग्रहाच्या पायाभूत विचारांमध्ये स्पष्टपणे जाणवतो. साहित्य हे केवळ रंजनासाठी नसून विचारप्रवर्तनासाठी असावे, या भूमिकेची जाणीव या काव्यसंग्रहात प्रकर्षाने दिसते. हा संग्रह समकालीन नवसाहित्याच्या प्रवाहाचे प्रतिनिधित्व करतो. कवयित्रीची दृष्टी आधुनिक असून त्यांच्या कवितेत आशय, भाषा आणि रूप यांमध्ये बदल जाणवतो. मानवप्रेम, आशावाद आणि व्यापक सामाजिक भान ही या ‘कवी मन हे स्त्री किंवा पुरुष नसून फक्त कवीचे असते’ या विचारातून त्यांनी संवेदनांची सार्वत्रिकता अधोरेखित केली आहे. वेदना, दुःख आणि जाणीवा या त्यांच्या कवितेचा पाया असूनही त्या केवळ स्त्री अनुभवापुरत्या मर्यादित राहत नाहीत; सामाजिक, राजकीय आणि मानवी प्रश्नांवरही परिपक्व भाष्य करतात. आंबेडकरी विचारधारा ही विषमतेविरुद्धचा विद्रोह आहे. समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांसाठी ती कार्यरत राहते. समाजातील जातिव्यवस्थेची उतरंड ही ‘पायऱ्या नसलेला मनोरा’ असल्याचे चित्रण करताना कवयित्री तिच्या दुष्परिणामांवर तीक्ष्ण भाष्य करतात. ‘जात’, ‘जात का बदलायची’ आणि ‘जात चोरू पाहत आहे’ या कवितांमधून त्या जातीय राजकारण करणाऱ्यांना आणि स्वार्थी मानसिकतेला आरसा दाखवतात. इतिहास विसरून केवळ वैयक्तिक प्रगतीचा विचार करणाऱ्या वृत्तीवर त्या प्रहार करतात. ‘प्रबोधक’ या कवितेत व्यंगात्मक शैलीचा प्रभावी वापर दिसतो. मोजक्या शब्दांत मोठा आशय व्यक्त करताना ‘पोट’ हे लोभाचे प्रतीक म्हणून वापरले आहे. समाजप्रबोधनाचा आव आणणाऱ्या, पण प्रत्यक्षात स्वार्थी असणाऱ्या लोकांवर ही कविता तिखट टीका करते. ‘म्होरक्या’ या कवितेतही नेतृत्वाच्या नावाखाली चालणाऱ्या दिखावूपणावर भाष्य केले आहे. धर्म हा मानवी एकात्मतेस अडथळा ठरणारा घटक ठरू शकतो, या विचारालाही कवयित्री स्पर्श करतात. अंधश्रद्धा, मानसिक गुलामगिरी आणि असमानतेला पोषक असणाऱ्या धार्मिक आडाख्यांवर त्या टीका करतात. ‘दगळाची टाळू’ या कवितेतून समाजातील शोषणाची रचना प्रतिकात्मक पद्धतीने मांडली आहे. वरचे लोक फायदा घेतात, तर खालचे लोक त्याला आधार देतात. आर्थिक विषमता आणि भूक यांसारख्या मूलभूत प्रश्नांवरही या संग्रहात प्रभावी भाष्य आहे. ‘भूक’, ‘चूल’, ‘भुकेचे संदर्भ’ आणि ‘भाकरीसाठी’ या कवितांमधून दारिद्र्याचे वास्तव उलगडते. ‘आता मी भावूक होत नाही’ ही ओळ मानवी संवेदनांच्या गळचेपीचे चित्रण करते. येथे वास्तववाद, प्रतिकात्मकता आणि विरोधाभास यांचा प्रभावी संगम दिसतो. कवयित्रींच्या लेखणीतून विज्ञानवाद, तर्कवाद आणि बुद्धिवाद यांचा पुरस्कारही दिसतो. ‘बुद्धिवादाच्या दिशेने’ या कवितेत त्या अंधानुकरणावर टीका करून विचारस्वातंत्र्याचे समर्थन करतात. समाजातील असहिष्णुता, अज्ञान आणि अतिरेकी प्रतिक्रिया यांवर उपरोधिक पद्धतीने प्रहार करत त्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन करतात. याचबरोबर, कवयित्री आशावादालाही तितकेच महत्त्व देतात. ‘झेंडा’, ‘तो योद्धा’, ‘विझणार नाही’, ‘चंद्र उगवेल तिमिराचा’ या कवितांमधून प्रेरणादायी विचार मांडले आहेत. कठीण परिस्थितीतही सकारात्मकतेचा धागा धरून पुढे जाण्याचा संदेश या कवितांमधून मिळतो. पानझडीनंतर वसंत येतोच, हा आशावादी दृष्टिकोन त्यांच्या लेखणीतून सातत्याने व्यक्त होतो. या काव्यसंग्रहात मानवी भावभावनांचीही सुंदर गुंफण आहे. प्रेम, वात्सल्य, मैत्री, विरह आणि जन्मभूमीशी असलेले नाते या विविध भावविश्वाचा अनुभव यातून येतो. कठीण परिस्थितीतही नात्यांची हिरवळ जपणारे कवीमन येथे दिसते. स्त्रीवादी दृष्टीकोन हा या संग्रहाचा महत्त्वाचा पैलू आहे. ‘विखारी’, ‘बाईपण’, ‘पाऊलखुणा’, ‘ती’, ‘वादळ’, ‘विधवा’, ‘उंबरठा’, ‘कुंकू’ अशा कवितांमधून स्त्रीजीवनाची मिमांसा होते. पुरुषसत्ताक परंपरांचा विरोध, स्त्री-पुरुष समानतेची मांडणी आणि स्वत्वाचा शोध या कवितांमधून व्यक्त होतो. स्त्रीवाद केवळ वेदना मांडण्यात न अडकता परिवर्तनाची ऊर्जा म्हणून येथे समोर येतो. कवयित्री संवेदनशीलता, उपरोध, बंडखोरी आणि वास्तववाद यांचा संतुलित वापर करतात. त्यांच्या कवितेची भाषा सोपी आणि सर्वसामान्यांना समजणारी आहे. त्यामुळे भावार्थ सहजपणे पोहोचतो. प्रतिक आणि रूपकांचा वापर प्रभावी असूनही तो गुंतागुंतीचा वाटत नाही. एकूणच, ‘बोलत राहिले पाहिजे’ हा काव्यसंग्रह केवळ एका विषयापुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण समाजजीवनाचा वेध घेतो. मानवकल्याण, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांची जपणूक करताना कवयित्रीने सकारात्मकता, आत्मविश्वास आणि धैर्य यांचा संदेश दिला आहे. ‘माझी माणसं विभागली गेली, बोलत राहिले पाहिजे’ या ओळीतून संवादाची गरज अधोरेखित होते. अनुभव, जाणीवा आणि प्रज्ञेच्या आधारे असत्य, दांभिकता आणि विषमता यांविरुद्ध ठामपणे बोलण्याची भूमिका घेणाऱ्या या कवयित्रीचा हा संग्रह समाजप्रबोधनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो. त्यांच्या पुढील साहित्यप्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. ■ ■



**अमृता मनोहर**
मो.7499139144

## मराठी स्त्रीवादी समीक्षेत भर टाकणारा ग्रंथ

# दलित कवयित्रींच्या कवितेतील आंबेडकरी स्त्रीवाद

मराठी साहित्यात स्त्रीवादी समीक्षेची परंपरा समृद्ध असली तरी तिच्यातील मर्यादा आणि उणिवा लक्षात घेऊन नव्या दृष्टिकोनाची गांचा ‘दलित कवयित्रींच्या कवितेतील आंबेडकरी स्त्रीवाद’ हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा ठरतो. डॉ. अनंत दा. राऊत यांनी केलेल्या परीक्षणातून या ग्रंथाचे वैचारिक, सामाजिक आणि साहित्यिक महत्त्व प्रकर्षाने समोर येते. हा ग्रंथ केवळ स्त्रीवादी विचारांचा अभ्यास नसून तो आंबेडकरी विचारधारेच्या प्रकाशात स्त्रीच्या प्रश्नांचे पुनर्मूल्यांकन करणारा आहे. डॉ. रेखा मेश्राम या आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या असून त्यांनी ‘रमाई’ या मासिकाच्या माध्यमातून स्त्रियांना अभिव्यक्तीचे प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालवलेले हे नियतकालिक मराठी साहित्यविश्वात वेगळे स्थान निर्माण करते. त्यामुळे त्यांच्या लेखनाला केवळ शैक्षणिक नव्हे तर चळवळीचा अनुभव आणि वास्तवाची जाणीव लाभलेली आहे. मराठीतील प्रस्थापित स्त्रीवादी लेखनावर एक महत्त्वाची टीका म्हणजे ते बहुतेक वेळा उच्चवर्णीय, शहरी आणि मध्यमवर्गीय स्त्रियांच्या अनुभवांपुरते मर्यादित राहिले आहे. या लेखनात स्त्री-पुरुष संबंध, विवाहसंस्था, व्यक्तिगत स्वातंत्र्य यांवर भर दिला जातो; परंतु जात, वर्ग, श्रम, दारिद्र्य आणि सामाजिक विषमता या मूलभूत प्रश्नांकडे अपेक्षित लक्ष दिले जात नाही. भारतीय स्त्रीचे वास्तव हे बहुपदरी आहे. ती दलित, आदिवासी, ग्रामीण, भटक्या अशा विविध स्तरांमध्ये जगते. या स्तरांतील स्त्रियांचे प्रश्न केवळ वैयक्तिक नसून सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आहेत. त्यामुळे या प्रश्नांचे प्रतिनिधित्व करणारा स्त्रीवाद अधिक व्यापक असणे आवश्यक आहे.

याच ठिकाणी आंबेडकरी स्त्रीवादाची संकल्पना महत्त्वाची ठरते. आंबेडकरी विचारधारेचा केंद्रबिंदू म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये. या मूल्यांच्या आधारे स्त्रियांच्या सर्वांगीण मुक्तीची कल्पना आंबेडकरी स्त्रीवाद मांडतो. तो केवळ पुरुषसत्ताकतेविरुद्ध लढत नाही, तर जातिव्यवस्था, वर्णवर्चस्व, अंधश्रद्धा आणि विषमतावादी धार्मिक संकल्पनांनाही नाकारतो. त्यामुळे हा स्त्रीवाद केवळ लिंगभेदापुरता मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण सामाजिक रचनेचा पुनर्विचार करतो. डॉ. मेश्राम यांनी आपल्या ग्रंथात दलित कवयित्रींच्या कवितेचा अभ्यास करताना या आंबेडकरी स्त्रीवादाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. दलित कवयित्रींच्या कवितेत व्यक्त होणारी जाणीव ही आत्मकेंद्री नसून समष्टीक आहे. त्यांच्या कवितेत वैयक्तिक वेदना असली तरी ती सामूहिक अनुभवाचे रूप धारण करते. या कवितांमध्ये अन्यायाविरुद्धचा विद्रोह, स्वाभिमानाची जाणीव आणि मुक्तीची आकांक्षा स्पष्ट दिसते. आंबेडकरी स्त्रीवादाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तो पुरुषाला शत्रू मानत नाही. तो स्त्री-पुरुष समतेची मागणी करतो आणि दोघांनी मिळून समताधिष्ठित समाज उभारण्याचा आग्रह धरतो. याउलट काही प्रस्थापित स्त्रीवादी प्रवाहांमध्ये पुरुषांविषयी विरोधाची भूमिका आढळते. आंबेडकरी स्त्रीवाद मात्र सहकार्य, संवाद आणि समन्वय यावर भर देतो.

धर्माच्या संदर्भातही आंबेडकरी स्त्रीवाद वेगळी भूमिका घेतो. तो अंधश्रद्धा, कर्मकांड आणि विषमता निर्माण करणाऱ्या धार्मिक संकल्पनांना नाकारतो. त्याऐवजी नैतिकता, मानवता आणि संविधानिक मूल्यांवर आधारित जीवनपद्धतीचा पुरस्कार करतो. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या चौकटीत स्त्रियांच्या स्वातंर्त्याची मागणी करणे हे त्याचे वैशिष्ट्य आहे. डॉ. रेखा मेश्राम यांनी दलित कवयित्रींच्या कवितेतील आंबेडकरी स्त्रीवादाचे विश्लेषण करताना अनेक महत्त्वपूर्ण उदाहरणे दिली आहेत. हिरा बनसोडे, प्रज्ञा दया पवार यांसारख्या कवयित्रींच्या कवितांमधून स्त्रियांच्या वेदना, संघर्ष आणि प्रतिकाराची जाणीव प्रभावीपणे व्यक्त होते. या कवितांमध्ये केवळ विचार नसून तीव्र भावगर्भता आणि काव्यात्मकता देखील आहे. त्यामुळे या कवितांना केवळ गद्यात्मक म्हणणे योग्य ठरत नाही. दलित स्त्रियांच्या कवितेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ती बोली भाषेतून व्यक्त होते. ही भाषा त्यांच्या वास्तवाशी जोडलेली असल्यामुळे ती अधिक प्रभावी आणि जिवंत वाटते. या कवितांमध्ये कृत्रिमता नसून वास्तवाचा थेट स्पर्श आहे. त्यामुळे त्या वाचकाला विचार करायला भाग पाडतात. या ग्रंथाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याने स्त्रीवादाच्या मर्यादा दाखवून देत नवा मार्ग सुचवला आहे. स्त्रीवाद हा केवळ स्वातंत्र्याचा आग्रह धरणारा नसून तो जबाबदारीची जाणीव ठेवणारा असावा, असे या ग्रंथातून स्पष्ट होते. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यामधील सूक्ष्म फरक ओळखणे आवश्यक आहे, हा महत्त्वाचा संदेश यातून मिळतो. एकूणच,




‘दलित कवयित्रींच्या कवितेतील आंबेडकरी स्त्रीवाद’ हा ग्रंथ मराठी स्त्रीवादी समीक्षेला नवी दिशा देणारा आहे. तो स्त्रीच्या प्रश्नांकडे केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भात पाहण्याची दृष्टी देतो. हा स्त्रीवाद मानवतावादी असून तो सर्वांच्या कल्याणाचा विचार करतो. समाजात खरी समता प्रस्थापित करायची असेल, तर स्त्री-पुरुषांनी परस्परांविरोधात नव्हे तर परस्परांच्या सहकार्याने पुढे जायला हवे. आंबेडकरी स्त्रीवाद हीच दिशा दाखवतो. त्यामुळे हा विचार केवळ साहित्यापुरता मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनासाठीही महत्त्वाचा ठरतो. ■ ■

**डॉ. अनंत दा. राऊत**

## काव्यफुले



संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

### अखंड

सत्य सर्वांचे आदी घर ॥
सर्व धर्मांचे माहेर॥ धृ.॥
जगांमाजीं सुख सारें ॥
खास सत्याचीं ती पोरें॥
सत्य सुखाला आधार॥
बाकी सर्व अंधकार ॥
आहे सत्याचा बा जोर॥
काढी भंडाचा तो नीर ॥
सत्य आहे ज्याचें मूळ ॥
करी धूर्तांची बा राळ॥
बळ सत्याचें पाहुनी॥
बहुरूपी जळे मनीं॥
खरें सुख नटा नोव्हे॥
सत्य ईशा वर्जू पाहे॥
जोती प्रार्थी सर्व लोकां॥
व्यर्थ डंभा पेटूं नका ॥

- म. ज्योतिराव फुले

### तू....

तू ज्या दिवशी
तुझ्या पायातला काळा धागा
तोडून
सनातन्यांच्या छाताडावर पाय
देऊन उभी राहशील
तोच दिवस तुझा महिला दिन
असेल..
महिला दिनाच्या गप्पा
करणाऱ्यांनी
कधीच बाजू घेतली नाही
खैरलांजीच्या प्रियंकाची
दलीत स्त्रियांच्या अत्याचाराची..
म्हणून तू कुठल्याही दिनाच्या
मोहात अडकू नकोस...
तुझ्या उद्धारासाठी ज्या दिवशी
ज्योती - सावित्रीने खडू हाती
घेतला, मी तर तोच खरा
महिला दिन मानला
मी तर तोच खरा
महिला दिन मानला..

- सागर भवते

### प्रणाम आंबेडकरा

पशुहिन जिणं जगणाऱ्यांचा, तू
जीवनदीप खरा
तुझ्या निर्झरामुळेच झरतो माणुसकीचा झरा
तुजला प्रणाम आंबेडकरा ॥धृ॥
लाख लाख आयुष्यातला, महामानवा
अंधार चिरला,
सुर्य झेलुनी छातीवरती, मानवसुर्या
प्रकाश पेरला
तुचं तोडल्या युगायुगाच्या रूढी-
परंपरा॥धृ॥
कुठेच नव्हता आम्हा मान, तुचं
शिकविला स्वाभिमान
म्हणून शोषित समस्त मानव करितो
जयभिम अभिमानानं
युगे युगे रे नांव तुझे रे घेईन
वसुंधरा॥धृ॥
मायेहून मायाळ होवूनी, अमुचे वरती
केलीस ममता,
हक्कांसाठी पेटुनी उठला,दफन केलीस
तू विषमता
स्वातंत्र्य अन् समानतेच्या रूजविलेस
अंकुरा ॥धृ॥

-मिलिंद खैरकर

### भीम गाथा

प्रेषित बाबासाहेब
स्वातंत्र्यानंतर एक अविस्मरणीय
घटना घडली
माणसं जथ्थ्या-जथ्थ्यान जमा होऊ
लागली !
वाटलं होतं हा समाज
अन्यायाखाली दबला
पण त्यांनी आपली नवी ओळख
पटवली !!
हात उंचावून कोणी एक प्रेषित
सांगत होता
उठा, 'शिका, संघटित व्हा, आणि
संघर्ष करा' !
सर्वसामान्यांच्या हितासाठी तो उभा
राहतो
दिनदलितांच्या लेकरा-बाळासह
चालू लागतो !!
त्याचा आवाज इतका बुलंद ठरतो
की देशाचा कोपरा न कोपरा
ढवळून निघतो !
ऊन-वारा,पावसाची तमा न
बाळगता
शोषितसमाज जथ्थाजथ्थाने
रस्त्यावर येऊ लागतो!
समाज, शासन आणि हवालदिल
माणसं यांच्यातली अन्यायाची
लढाई सुरू होते !
ही लढाई जिवंत ठेवण्यासाठी
त्याचा एकच श्वास पुरेसा ठरते !!
समस्त शोषित, पीडित माणसांच्या
हक्कासाठी आणि अधिकारासाठी!
अक्षरक्रांतीचा दिवा दिव्याने पेटवतो
युगे युगे इतिहासाच्या पानोपानी!!

- डॉ. साधना तेलरांधे

### बॅरिस्टर

चांदा नगरीत
उदयास आला
हर्ष मणी झाला.
देवाजीनां.

पैकाईचा नात
इंदिरा तनुज
संसाराचा नाज
भाऊराव.

झाला थोर मोठा
विदेशात गेला
शिकुनिया आला
बॅरिस्टर.

मानस तो पुत्र
डॉ. बाबासाहेबांचा
नेता विचारांचा
एकनिष्ठ.

वंचितांचा नेता
बॅरिस्टर झाला
मागे ना हटला
जिवनात.

ऐहिक सुखाचा
त्याने त्याग केला
देह अर्पितला
समाजाला.

हरी बोल बोले
भ्रष्ट राजसत्ता
अंगिकारा कित्ता

- राजाभाऊ

### आता तरी बोल रे...

ऐकतोयस का तू ?
हा आवाज करवतीचा नाही
ही माझ्या छातीची चिरफाड आहे!
उभा होतो इथे मी वर्षानुवर्षं
तुझ्या उन्हात सावली बनून
तुझ्या श्वासात प्राण बनून
आणि आज ?
तूच उभा आहेस माझ्यासमोर,
हातात धार घेऊन!
काय चूक केली मी ?
ऑक्सिजन दिला म्हणून ?
की नि:शब्द राहिलो म्हणून ?
बोल ना! आज तरी बोल!
की माझं शांत असणं
तुझ्या क्रौर्याला परवानगी बनलं ?

प्रत्येक फांदीत एक घर होतं रे!
प्रत्येक पानात एक श्वास
तोडताना ऐकलास का कधी
त्या घरांचा कोसळणारा आक्रोश ?
तुला दिसत नाही ना माझं रक्त ?
कारण ते लाल नाही
ते हिरवं आहे!
मातीमध्ये मुरतंय शांतपणे
एक लक्षात ठेव
उद्या जेव्हा उन्हं जळतील
आणि तू सावली शोधशील
तेव्हा माझा हा पडलेला देह
तुला प्रश्न विचारेल



कुठे गेलो मी ?
कुंभ भरून पाणी वाहशील
पुण्य मिळवलं म्हणशील
पण माझ्या मुळांवरचा हा वार
कोणत्या तीर्थात धुणार आहेस ?
थांब! अजून वेळ गेलेली नाही
करवतीला थांबवावं लागेल,
नाहीतर उद्या तुझ्या श्वासालाच
धार लागेल!

डॉ. लीना निकम

# ‘बौद्धपर्व’ चे रचनाकार वा. गो. आपटे

सम्राट अशोक चरित्र, बौद्ध धर्माचा साद्यंत इतिहास, जैनधर्म, ज्ञानदीप आणि भारतकन्यासारखे प्रेरणादायी, उद्बोधक ग्रंथ लिहिणारे जुन्या काळातील प्रज्ञावंत वासुदेव गोविंद आपटे यांची आज, 12 एप्रिल रोजी 155वी जयंती त्यानिमित्ताने.. निबंधकार, कोशकार, अनुवादक म्हणून अतुलनीय कार्य करणारे जुन्या पिढीतील एक प्रज्ञावंत वासुदेव गोविंद आपटे यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे 12 एप्रिल 1871 रोजी झाला. माध्यमिक शिक्षण धुळे येथे तर उच्च शिक्षण इंदूर आणि नागपूर येथे झाले. 1893 साली कोलकाता विद्यापीठाची बी.ए. पदवी संपादन करून पुणे येथील नूतन मराठी विद्यालयात शिक्षक म्हणून रुजू झाले. 1910 साली इंदूरच्या चंद्रावती महिला विद्यालयात नोकरी केली. या काळात इंदूर सरकारने ‘मल्हारीमार्तंड’ या पत्राचे संपादकत्व त्यांना दिले. पाच वर्षे त्यांनी ते काम केले. याशिवाय ‘ज्ञानप्रकाश’चे संपादकपद, ‘विचारसाधना’चे संपादकपदही काही काळ भूषविले. आपटे यांनी आपल्या जीवनात प्रचंड लेखनकार्य केले. मराठी साहित्याविषयीची गोडी निर्माण होण्यास त्यांची तल्लख, कुशाग्र बुद्धिमत्ता कारणीभूत ठरली. उमेदीच्या काळात त्यांचे लेखक मोती बुलासा आणि प्राचार्य वा. ब. पटवर्धन यांच्याशी अतूट मैत्रीचे ऋणानुबंध जुळले. सोबतच कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांचा सहवास लाभला. हरिभाऊ त्यांचे प्रेरणास्त्रोत आणि मार्गदर्शक होते. आपटे यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झालेले बौद्ध धम्मावरील ‘सम्राट अशोक यांचे चरित्र’ आणि ‘बौद्धपर्व’ अथवा ‘बौद्धधर्माचा साद्यंत इतिहास’ हे दोन ग्रंथ मैलाचा दगड ठरले. ‘अशोक अथवा आर्यावर्ताचा पहिला चक्रवर्ती राजा’ यांचे चरित्र त्यांनी (1899) साली लिहिले. तत्पूर्वी ‘अशोक’ हा ग्रंथ विष्णू गो. विजापूरकर यांच्या ‘ग्रंथमाला’ मासिकातून प्रसिद्ध झाला होता. अशोकाचे चरित्र वाचताना आजही रोमांच उभा होतो. एके ठिकाणी मानवसमाजाला उद्देशून सम्राट अशोक म्हणतात, ‘धर्माच्या बाबतीत माणसाने मधुमक्षिकेचे व्रत आचरावे. जगात जे काही चांगले व ग्राह्य ते आनंदाने टिपून घ्यावे. त्याचे संकलन करावे. त्याचा लाभ स्वतः घ्यावा व दुसऱ्यांना द्यावा. धम्माचे जाळे विणत जावे.’ दुसरा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ‘बौद्धपर्व’ अथवा ‘बौद्धधर्माचा साद्यंत इतिहास’ होय. गौतम बुद्ध आणि बौद्ध धम्माचा सविस्तर इतिहास सांगणारा हा मराठी ग्रंथ आहे. यात केवळ धम्मविचारांचाच नव्हे तर बौद्धधम्मामुळे लोकांच्या बुद्धी, नीती आणि शास्त्रांमध्ये झालेल्या विकासाचेही ओझरते दर्शन घडविते. हा ग्रंथ बौद्ध धम्माच्या अभ्यासासाठी एक महत्त्वाचे आणि समग्र माहिती देणारे स्त्रोत मानले जाते. बौद्धपर्व ग्रंथाने बुद्धप्रेमींच्या जीवनात खरोखरच एक वैचारिक क्रांती घडवून आणली. प्रस्तुत ग्रंथ आपटे यांनी 1905 साली लिहिला आणि त्याचे प्रकाशन 1914 साली केले. या ग्रंथाची दुसरी आवृत्ती 14 एप्रिल 1957 रोजी निघाली आणि तिसरी आवृत्ती 26 जानेवारी 1958 रोजी प्रकाशित झाली. तिसीया आवृत्तीला डॉ. बाबासाहेबांचे चिरंजीव यशवंतराव उर्फ भय्यासाहेब आंबेडकर यांची उद्बोधक प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तावनेत भय्यासाहेब म्हणतात, ‘लेखकाला बोधप्रद आणि विवेचक ग्रंथाचे श्रेय जातेच पण त्याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुण्याशिर्वाद लाभला होता, हेही तेवढेच खरे आहे.’ सोबतच जैनधर्म (1904) आणि ‘ज्ञानदीप’, ‘भारतकन्या’ ही पुस्तकेही लिहिली. तरुण पिढीला राष्ट्रीय, सामाजिक व धार्मिक गोष्टींचे सम्यक ज्ञान मिळावे या उद्देशाने त्यांनी ‘विचारसाधना’ (1920) नावाचे वर्तमानपत्रही सुरू करून पाहिले, परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते बंद करावे लागले. त्यांच्या एकूण लेखनापैकी सुमारे 75 टक्के लिखाण भाषांतरित, रूपांतरित व आधारित अशा स्वरूपाचे आहे. लेखन हा व्यवसाय त्यांनी आर्थिकदृष्ट्या यशस्वी करून दाखविला. त्यांचे साहित्य - मिसेस हेन्रीवुड, सॅम्युएल लव्हर, बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या दुर्गेशनंदिनी आदी कादंबऱ्यांचे मराठी अनुवाद; ‘मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी’ (1910), ‘लेखनकला आणि लेखनव्यवसाय’ (1925), ‘मराठी शब्दरत्नाकर’ (1922), ‘मराठी शब्दार्थचंद्रिका’ (1922), आणि ‘मराठी बंगाली शिक्षक’ (1925) ही भाषाभ्यास विषयक; ‘टापटीपचा संसार’ (1914),‘बालोद्यान पद्धतीचे गृहशिक्षण’ (1918), ‘सौंदर्य आणि ललितकला’ (1919) इ. विविध विषयांवरील चोवीस-पंचवीस पुस्तके व बालवाङ्मय विभागात छोटी छोटी तीस-बत्तीस पुस्तके त्यांनी लिहिली. मराठी साहित्याच्या सर्वांगाला परिसस्पर्श करीत असताना आपटे बालवाङ्मयविषयक कार्यामुळे ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचले. बाल साहित्यासाठीचे त्यांचे योगदान लक्षणीय आहे. 1906 साली त्यांनी ‘आनंद’ हे मासिक मुलांकरिता सुरू केले. ते आजही नियमितपणे सुरू आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेचा पहिला मसुदा आपटे यांनी लिहिला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या आद्य चिटणिसांपैकी ते एक होते. त्यांनी दहा वर्षे चिटणीसपद भूषविले. अशा या विलक्षण प्रतिभावंताचे 2 फेब्रुवारी 1930 रोजी निधन झाले. ते शरीराने गेले असले तरी कीर्तीरूपाने अजरामर आहेत. त्यांची आट साहित्यसंपदा, बौद्ध धम्मावर भरभरून लिहिलेले त्यांचे ग्रंथराज, बालसाहित्य युगानुयुगे मानवसमाजाला ‘नवा मार्ग, नवी दिशा’ दाखवित अखंड प्रेरणा देत राहतील. 155व्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन. मानाचा मुजरा. ■ ■











**मिलिंद मानकर**
मो. 8177866397

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प ११८

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सेव, तह. उमरेड, जि. नागपूर




डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमचे मुक्तीदाते असून आमचे आयुष्य त्यांनी फुलविले आहे ही भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति आहे . परिसरातील लोक पुतळ्या जवळ दिनविशेष कार्यक्रमाला एकत्र येतात.

संवाद मित्र, मुकुंद मेश्राम.
9923522083

### सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांचे आवाहन

# मे महिन्यात बुद्धगयाला जावू...



**नाशिक :** नाशिक येथे पत्रकार सतीश रुपवते आणि अविनाश आहेर या दोन सामाजिक कार्यकर्त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने प्रकाशित केलेल्या विशेष अंकाचा प्रकाशन कार्यक्रम अनिल वैद्य माजी न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. संजय शिरसाट, सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते. ते म्हणाले डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जोपासने आपले कर्तव्य आहे. मे महिन्यात गया येथे ते ट्रेन ने सर्वसामान्य जनतेला मोफत नेणार असून जाण्या-येण्याचा खर्च आणि जेवणाचा खर्च तसेच औषधोपचार वगैरे मोफत करणार आहे. या साठी ज्यांना गया येथे भ. बुद्धाचे दर्शन घ्यायचे आहे त्यांनी तयार राहावे. असेही त्यांनी आवाहन केले. तसेच गया येथे एका जागेमध्ये महाराष्ट्रातील उपासकांची राहण्याची व्यवस्था होईल असे महाराष्ट्र भवन बांधण्याची योजना असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला नाशिक शहरातील पत्रकार आणि सामाजिक कार्य करणाऱ्यांचा सत्कार संजय शिरसाठ सामाजिक न्याय मंत्री आणि अनिल वैद्य माजी न्यायाधीश यांच्या उपस्थितीत करण्यात आला रोटरी क्लब नाशिक येथे झालेल्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी परखेड मत व्यक्त केले ते म्हणाले आजचे पत्रकार हे स्वतःच्या मनाने लिहीत नसून मालकाच्या मतांनी लिहितात पूर्वी असे नव्हते त्यांचेही मजबुरी आहे त्यांनाही नोकरी करावी लागते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी न्यायाधीश आणि सुप्रसिद्ध लेखक अनिल वैद्य हे होते. प्रमुख अतिथी मिलिंद गायकवाड पुणे, आनंदराज आंबेडकर यांची पुत्र अमन आंबेडकर पत्रकारितेचे प्रमुख प्राध्यापक सोनवणे आणि नाशिक पोलीस आयुक्त कर्णिक साहेब होते. या कार्यक्रमात मान्यवरांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला

# डॉ. मुकुंद मेश्राम यांच्या बॅ. राजाभाऊ खोब्रागडे व काव्यसंग्रहाचे पुस्तकांचे थाटात प्रकाशन



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्वासाला तडा जाऊ नये म्हणून रिपब्लिकन नेते बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी शेवटच्या अंतिम श्वासापर्यंत आंबेडकरी बाणा सोडला नाही असे जेष्ठ पत्रकार अनिल वासनिक यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भदंत नागदिपंकर, प्रा. गौतमी डोंगरे खोब्रागडे, कार्यकारी संपादक विलास गजभिये, जेष्ठ पत्रकार अनिल वासनिक, सुर्यकांत मुंघाटे, चंद्रशेखर उमाठे, लेखक डॉ. मुकुंद मेश्राम होते. राज्यसभेचे माजी उपसभापती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानसपुत्र बॅरी. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानसपूत्र बॅरी. राजाभाऊ खोब्रागडे पुस्तक व व्यावर्तक काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत हिंदी मोर भवन बर्डी, नागपूर येथे थाटात करण्यात आले. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेले पुस्तक डॉ. मुकुंद मेश्राम यांनी लिहले आहे असे प्रा. गौतमी डोंगरे यांनी सांगितले. रस्तावर आणि संसदेत बुलंद आवाज म्हणजे बॅरि. साहेब होते असे कार्यकारी संपादक विलास गजभिये तर आम्ही रिपब्लिकन पक्षात कार्य केले हा आमचा अभिमान आहे असे भदंत नागदिपंकर महास्थवीर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले. गझलकार सुर्यकांत मुंघाटे यांनी काव्यसंग्रहावर विचार व्यक्त केले. मी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली कार्य केले याचा आजही अभिमान आहे असे पुस्तकाचे लेखक डॉ. मुकुंद मेश्राम यांनी सांगितले. प्रकाशक चंद्रशेखर उमाठे यांनीही विचार व्यक्त केले. संचालन राजकुमार रंगारी, प्रास्ताविक हरीदास बेलेकर आभारप्रदर्शन जासूद पाटील यांनी केले. कार्यक्रमाला रामभाऊ आंबुलकर, हरीश जानोरकर, रामभाऊ बागडे, प्रबोधन मेश्राम, मनोहर गजभिये, पुरुषोतम गायकवाड, घनशाम फुसे, शंकर ढेंगरे, अनिल मेश्राम, मनोहर दुपारे, कृष्णा बोरकर, अंजना मेश्राम, सुहानी पारसी, देवयानी मेश्राम, फैजान शेख, रोहीत माझा, विलास पिल्लेवान, बबिता भोवते, देवयानी वंजारी, रोहीत मेश्राम आदी उपस्थित होते.

## महत्वाचे



### महात्मा फुले जयंतीनिमित्त बीआरएसपीकडून अभिवादन

**नागपूर :** बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी (बीआरएसपी) नागपूर तर्फे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतीला फुले यांच्या जयंतीनिमित्त कॉटन मार्केट येथील त्यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महिला आघाडी अध्यक्ष विश्रांती झांबरे, शहराध्यक्ष डॉ. विनोद रंगारी तसेच पंजाबराव मेश्राम, एच. डी. डोंगरे, माया मेश्राम, सुनंदा गायकवाड, रेखा मेश्राम, मंदा फोपरे, अशोक बागडे, प्रवीण खापर्डे, सुरेश उके, देवानंद सोनडवले, ऋषीं मुन, विलास पारखंडे, चंद्रभान मेश्राम आदी उपस्थित होते.

### नागपुरात महिलेचे घर पाडल्याचा आरोप; प्रकरण गाजले

**नागपूर :** शहरातील जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीत नारा रोडवरील नागसेन नगर परिसरात एका महिलेचे घर कथितपणे बेकायदेशीरपणे पाडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे 30 ते 40 जणांनी येऊन संबंधित महिलेचे घर बुलडोजरच्या सहाय्याने पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाची दखल घेत संबंधितांकडून न्याय मिळावा अशी मागणी होत असून, घटनेची चौकशी करण्याची मागणीही पुढे येत आहे.

## महात्मा फुले जन्मद्विशताब्दीनिमित्त अभिनव अभिवादन



**नागपूर :** क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जन्मद्विशताब्दीनिमित्त परिवर्तन विचार मंचतर्फे अनोख्या पद्धतीने अभिवादन केले. महात्मा जोतिराव फुले जयंती दसरा-दिवाळीसारखी साजरी करण्याचा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता. त्यानुसार फुले विचारांचा प्रसार करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या ग्रंथांचे वाचन करत त्यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे डॉ. वीणा राऊत यांनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली, तर रंगराज गोसावी यांनी महात्मा फुले यांची भूमिका साकारून उपस्थितांना विचार प्रेरणा दिली. या माध्यमातून 'विचार ज्योत' प्रज्वलित केली.

या उपक्रमात सहभागी सर्वांनी हातात महात्मा फुले यांचेच ग्रंथ घेऊन अभिवादन केले, ज्यामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच सामाजिक आणि वैचारिक दिशा मिळाली.

कार्यक्रमात विलास गजभिये, डॉ. अजय चिकटे, उपेंद्र कांबळे, भदंत नागदीपंकर, जोत्स्ना बनसोड, विनोद आटे, डॉ. सूर्यकांता पाटील, रंगनाथ गोसावी, दिवाकर शिर्के, डी. आर. कांबळे, सुनीता रामटेके, श्रीराम बनसोड, डॉ. मोनाली फोपरे, प्रदीप शेंडे, डॉ. संजय शेंडे, डॉ. स्मिता मेहत्रे, मधुकर गायकवाड, ज्योती मून, वंदना क्षिरसागर, सुनिता पाटील, डॉ. वीणा राऊत, डॉ. माधव जांभुळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डी. आर. कांबळे यांनी केले.

## पट्टेवाटप धोरणात सुधारणा करा

**नागपूर :** नविन बाबुळखेडा सुधार संघर्ष समितीच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्षिय भाषणात प्रसिद्ध जेष्ठ पत्रकार व संयोजक, शहर विकास मंच, नागपूर म्हणाले की महाराष्ट्र शासन राबवित असलेल्या गोरगरीबांच्या पट्टेवाटप धोरणात आमुलाग्र बदल करणे आवश्यक असून त्याकरिता या क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रामुख्याने झोपडा शहर महासंघ, शहर विकास मंच व त्या संबंधात संलग्न असलेल्या संस्थांची बैठक बोलावणे आवश्यक आहे.

हा कार्यक्रम प्रसिद्ध समाजसेवक व नविन बाबुळखेडा सुधार संघर्ष समितीचे सचिव रामभाऊ बागडे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रभाग क्र. 33 चे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, त्यात प्रामुख्याने भारती बुंदे, मनोज गावंडे, शिला तराळे व अंकीत चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी झोपडा शहर विकास महासंघ, नागपूरचे सचिव राजकुमार वंजारी तसेच संघर्ष समितीचे प्रमुख मार्गदर्शक माजी उपजिल्हाधिकारी आर. एस. आंबुलकर यांचेही मार्गदर्शन लाभले. समितीच्या प्रश्नांवर यापुढेही समर्थन देण्याचे मान्य केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजसेवक प्रा. डॉ. प्रबोधन मेश्राम यांनी केले, तर संचालन प्रा. डॉ. आनंद गणवीर यांनी केले असून आभार प्रदर्शन निलेश भिवगडे यांनी केले.



## कल्पवृक्ष बुद्ध विहाराचे लोकार्पण व बुद्ध-आंबेडकर प्रतिमांचे अनावरण

**मौदा (जि. नागपूर) :** तालुका मौदा येथील खात रेल्वे स्टेशन परिसरात उभारण्यात आलेल्या कल्पवृक्ष बुद्ध विहाराचे लोकार्पण व तथागत गौतम बुद्ध तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे अनावरण समारंभ आज सकाळी मोठ्या उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महान विचारवंतराहुल सांस्कृतायन, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, शंकरराव खरात तसेच संघर्षसुत सिद्धार्थ यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. यावेळी 'बुद्ध, कबीर, फुले, आंबेडकर विचारधारा व आजची वाताहत' या विषयावर मार्गदर्शन करताना दीक्षाभूमी नागपूरचे सदस्य पूज्य भदंत नाग दिपंकर महास्थविर यांनी समाज परिवर्तनासाठी बौद्ध धम्म व समतावादी विचारांची आजही तितकीच गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्या हस्ते बुद्ध विहाराचे लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी कामठी येथील महामाया महिला सेवा संस्था यांच्या उपासिका तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला एकनाथ बागडे, मुकेश गजभिये, सुनील मेश्राम, कविता चव्हाण, धर्मशिला कोटांगले, अक्लिमा बागडे, शशिकला रंगारी, तिर्थमा पाटील, उज्वला बोरकर, सोनू रामटेके, अंकुर बोरकर आदी उपस्थित होते. तसेच महामाया महिला सेवा संस्था, कामठीच्या शेवंता नारनवरे, पंचशिला पानतावने, इंदिरा वाहाणे, रिना गजभिये, बबिता पाटील, लक्ष्मी गजभिये, बबिता रामटेके, प्रणिता गौरे, कविता ढोके, जिजा मेश्राम, वंदना कांबळे, उज्वला बन्सोड यांच्यासह अनेक महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले असून, परिसरात धार्मिक व सामाजिक वातावरण निर्माण झाले होते.

## समता सैनिक दलाची 13 एप्रिल रोजी दिल्लीत समता परिषद

**नागपूर :** समता सैनिक दल यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त 13 एप्रिल 2026 रोजी समता परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद दुपारी 4 वाजता आंबेडकर भवन, नवी दिल्ली येथे पार पडणार आहे. या परिषदेचे अध्यक्षस्थान समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डी. एम. कोटे भूषविणार असून, राष्ट्रीय मार्गदर्शक भदंत नागदीपंकर महास्थविर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच राष्ट्रीय प्रमुख संचालक डॉ. ए. आर. जोशी, राष्ट्रीय पी.आर.ओ. पी. सी. टेंभरे आणि राष्ट्रीय अतिरिक्त महासचिव दिवाकर मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेत एकूण 14 ठराव मंजूर करण्यात येणार असून, ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर करण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. तसेच 14 एप्रिल 2026 रोजी सकाळी 9 वाजता संसद भवन, नवी दिल्ली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मानवंदना देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी समता सैनिक दलाचे सुमारे 400 सैनिक व अधिकारी सहभागी होणार असून, ते 11 एप्रिल रोजी नागपूर रेल्वे स्थानकावरून दिल्लीकडे प्रस्थान करणार आहेत. ही माहिती समता सैनिक दलाचे विदर्भ जी.ओ.सी. राजकुमार बंजारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली असून, संबंधित कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.




## निधन वार्ता

### श्री. प्रभाकर माणिकराव दहने



**नागपूर :** अमरनगर येथील रहिवासी श्री. प्रभाकर माणिकराव दहने (वय 66 वर्ष) यांचे दि. 10 एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. उद्या शनिवारी सकाळी 9.30 वाजता. मानेवडा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात मुलगा गोपाल, गौरव, आई शीला व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### दयावंत गजघाटे



**नागपूर :** शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील धडाडीचे व्यक्तिमत्व दयावंत गजघाटे (वय 65, रा. चंद्रमणी नगर) यांचे आज, शनिवारी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. दयावंत गजघाटे यांच्या पार्थिवावर उद्या, रविवार रोजी दुपारी 3 वाजता मोक्षधाम घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील.



## दीक्षाभूमी विस्तारासाठी बसपाचे संविधान चौकात धरणे

**नागपूर :** दीक्षाभूमीच्या विकास, विस्तारीकरण व सौंदर्यकरणासाठी आवश्यक जागा मिळावी या मागणीसाठी बहुजन समाज पार्टी तर्फे संविधान चौकात प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन केले.

उत्तर दिशेची कॉटन रिसर्च सेंटरची 5 एकर व पूर्व दिशेची आरोग्य विभागाची 11 एकर जागा दीक्षाभूमीसाठी देण्यात यावी, तसेच दोन्ही प्रवेशद्वारांवरील बांधकामे थांबवावीत, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चव्हाण, रामदास आठवले, नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे व संजय शिरसाट यांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या माध्यमातून निवेदने पाठवली.

धरणे आंदोलनात दीक्षाभूमी स्मारक समितीचे विलास गजघाटे, डॉ. पुरण मेश्राम, विनायक जामगडे, प्रदीप मुन, भैय्याजी खैरकर, आशिष फुलझेले, मंगेश ठाकरे, नागोराव जयकर, प्रफुल मानके, विवेक हाडके, रंजना ढोरे, योगेश लांजेवार, संजय थुल, डॉ. भिलावे आदींनी मार्गदर्शन केले.

यावेळी 2015 व 2018 मधील बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी तातडीने करावी, अन्यथा राज्यभर आंदोलन तीव्र करण्यात येईल असा इशारा दिला. कार्यक्रमाचे संचालन उत्तम शेवडे यांनी तर समारोप अनिकेत कुत्तरमारे यांनी केला. मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### चारीका बुद्ध विहारात आज व्याख्यान

**नागपूर :** दि स्कूल ऑफ नोबल थॉट, नागपूर यांच्या वतीने 12 एप्रिल 2026 रोजी राष्ट्रीय जनगणना आणि आंबेडकरी बौद्धांची भूमिका या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात निवृत्त प्रधान सचिव (सामाजिक न्याय मंत्रालय) ॲड. किशोर गजभिये हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एन. बी. ठोके हे राहणार आहेत.

सकाळी 9.30 वाजता समाज भवन, चारीका बुद्ध विहार, शिल्पा सोसायटी, नरेंद्र नगर, नागपूर येथे हा कार्यक्रम होणार असून नागरिकांनी उपस्थित राहून ज्ञानवर्धनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मदिना निमित्त हार्दिक शुभेच्छा !

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को-ऑप. बँक लि. नागपूर
मुख्य कार्यालय: एम.ए. १, लक्ष्मीनगर चौक नागपूर.-४४००२२ फोन : ०७१२-२२२३६१७
ईमेल: ambedkarbank84@gmail.com

लक्ष्मी नगर शाखा: एम.ए १, लक्ष्मीनगर चौक, नागपूर-४४००२२. फोन: २२२३६१७
इंदोरा शाखा: मेश्राम भवन, डॉ. आंबेडकर मार्ग बुध्दनगर, नागपूर-४४००१७ फोन: २६४५२११
त्रिमुर्तीनगर शाखा: १५, गोवर्धन बिल्डिंग त्रिमुर्तीनगर चौक, नागपूर-२२ फोन: २२३१६१७

आपली बँक ! आपल्या सर्वांची बँक !!
समाज घटकांच्या आर्थिक उन्नतिचा दुवा !!!

मान्यवर भांडवलदार, खातेधारक, गुंतवणूकदार, ऋणको, संस्था, हितचिंतक आपणा सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन !

अधिकाधिक उत्तम सेवा प्रदान करतांनाच बँकेचे ब्रिद "सामाजिक घटकांच्या आर्थिक उन्नतीचा दुवा" यास बांधील राहून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या प्रेरणादायी पर्वावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को-ऑप. बँक लि., नागपूर तर्फे "विशेष कर्ज योजना" सिमित कालावधी करिता सुरू करण्यात आली आहे.

बँकेची आर्थिक स्थिती ३१ मार्च २०२६ अखेर

| विवरण | रूपये लाखात |
|---|---|
| भाग भांडवल | ४०१.२३ |
| ठेवी | ६३३२.४१ |
| कर्ज | ३२२३.१३ |
| निव्वळ नफा | ५४८.५८ |
| चालु वर्षाचा नफा (२०२५-२६) | ११.०९ |




सोनेतारण कर्ज
०.८३% मासिक व्याजदरावर



गृहतारण कर्ज
०.९० % मासिक व्याजदरावर

आयु. अरविंद गजभिये
उपाध्यक्ष

आयु. अनिल नगरारे
अध्यक्ष

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648